प्रकरण पाचवे

# *उपसंहार*

# प्रकरण पाचवे

## उपसंहार

दलित साहित्य हा साठनंतरच्या काळातील एक महत्त्वाचा साहित्यप्रवाह होय. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारकार्यामुळे व चळवळीने जागृत झालेल्या दलित समाजात शिक्षणाचा प्रसार झाला. त्यातून प्राप्त झालेल्या नव्या जीवनजाणिवेने दलित तरुण जीवनाकडे नव्या दृष्टीकोणातून पाहू लागला. स्वतःच्या समाजाची शतकानुशतकांपासून चालत आलेली दयनीय अवस्था व ती निर्माण होण्याची कारणे यांचा ते विचार करू लागले. डॉ.बाबासाहेब आंबेडकर, मार्क्स, बौद्ध आणि म.फुले यांच्या प्रेरणा घेऊन वेदना, विद्रोह आणि नकार या तत्त्वत्रयी मूल्यांचा स्वीकार या साहित्य प्रवाहाने केला. अलक्षित समाजजीवनाचे चित्रण साहित्यातून मोठ्या प्रमाणात होऊ लागले. अशा लेखकांमध्ये अर्जुन डांगळे हे एक महत्त्वाचे लेखक होत. डांगळे हे १९७० च्या काळातील एक महत्त्वाचे लेखक, कवी व समीक्षक होत. त्यांच्या साहित्याचा सर्वांगीण अभ्यास प्रस्तुत लघुप्रंबधात केला आहे.

अर्जुन डांगळे हे दलित साहित्याच्या पहिल्या पिढीतील कवी, कथाकार व विचारवंत तसेच दलित पँथर चळवळीतील आघाडीचे कार्यकर्ते म्हणून आपणास परिचित आहेत. महाराष्ट्राच्या सामाजिक, साहित्यिक, सांस्कृतिक व राजकीय चळवळीत चाळीसेक वर्षाहून अधिक काळ सक्रिय सहभाग घेणारे असे हे व्यक्तिमत्त्व आहे. त्यांचे ललित व चिंतनशील स्वरूपाचे लेखन हे वैशिष्ट्यपूर्ण आहे. दलित पँथर, कम्युनिस्ट चळवळ, शेड्यूल्ड कास्ट फेडरेशन, रिपब्लिकन पक्ष यासारख्या चळवळीबरोबरच बाबुराव बागूल, अण्णा भाऊ साठे, कर्मवीर दादासाहेब गायकवाड यांच्या विचारांचा प्रभाव त्यांच्या साहित्यातून जाणवतो. मार्क्सवादी व आंबेडकरी विचारांच्या प्रेरणा घेऊन त्यांचे साहित्य आविष्कृत होताना दिसून येते. सामाजिक जीवन जाणिवेचे अनेक पदर त्यांच्या साहित्यातून प्रकट होतात.

मानवी वर्तनाचा तळ शोधण्याचा प्रयत्न अर्जुन डांगळे यांच्या लेखनातून दिसून येतो. समाजदर्शन, विद्रोहाची जाणीव तसेच दलित समाजातील अनेकविध गुंत्यांचा वेध त्यांचे साहित्य घेते. साठनंतरच्या दलित साहित्यातील वेगळेपणाच्या प्रखर जाणिवेबरोबरच सामाजिक चळवळीचा, नव्या जीवनाचा एक भाग म्हणून किंवा दलित जीवनाचे दिशांकन ध्यानात येण्यासाठी प्रातिनिधीक स्वरूपात त्यांच्या साहित्याचा अभ्यास या लघुप्रबंधात केला आहे. या अभ्यासाची एकूण पाच प्रकरणात विभागणी केली असून ती पुढीलप्रमाणे.

१. प्रकरण पहिले : अर्जुन डांगळे यांची वाङ्मयीन जडणघडण

२. प्रकरण दुसरे : अर्जुन डांगळे यांची कविता

३. प्रकरण तिसरे : अर्जुन डांगळे यांची कथा

४. प्रकरण चौथे : अर्जुन डांगळे यांचे वैचारिक वाङ्मय

५. प्रकरण पाचवे : उपसंहार

यापैकी अभ्यासाच्या प्रमुख चार प्रकरणाबरोबर पाचवे उपसंहार हे प्रकरण केले आहे. या प्रकरणामध्ये मागील चार प्रकरणातील एकूण सार संक्षेपाने नोंदवले आहेत. अर्जुन डांगळे यांच्या लेखनातील बहुविधपणाचा, सामर्थ्याचा एकत्र स्वरूपाचा विचार वरील प्रकरणांतून केला आहे.

पहिल्या प्रकरणात *अर्जुन डांगळे यांची वाङ्मयीन जडणघडणीचा* विचार मांडला आहे. अर्जुन डांगळे यांची लेखक, कवी व विचारवंत म्हणून जडघडण कशी झाली याविषयीचे तीमध्ये विवेचन आहे. त्यांच्या वाङ्मयीन व्यक्तिमत्त्वावर बालपणापासूनच मार्क्स, डॉ.आंबेडकर यांच्या विचारांचा आणि तत्त्वज्ञानाचा प्रभाव पडला आहे. घरचे वातावरण हे आंबेडकरी व कम्युनिस्ट चळवळीचे असल्यामुळे बालपणापासूनच त्यांच्यावर या विचारांचे संस्कार झाले आहेत. परिणामी त्यांच्या साहित्यातून वर्गभेद, आर्थिक शोषण, दारिद्र्याची सूत्रे प्रकट होत गेली. लेबर कॅम्पच्या परिसरात आणि पँथरसारख्या चळवळीच्या माध्यमातून जे अनेकविध अनुभव आले त्याचा आविष्कार त्यांनी आपल्या साहित्यातून केलेला दिसतो. डांगळे यांच्या लेखनाची सुरुवात ही महाविद्यालयीन जीवनापासून झाली. ही सुरुवात होत असताना त्यांना अनेक नामवंत व्यक्तींचा सहवास लाभला. त्यांच्या विचारांचा, कार्याचा आणि सहवासाचा प्रभाव डांगळे यांच्या जडणघडणीवर झाला आहे. लहानपणापासूनच ते चळवळीमध्ये वाढले. तिथले वास्तव जीवन जगले. वयाच्या बाराव्या वर्षापासून त्यांनी चळवळीत प्रवेश केला. यातूनच त्यांचा एक चळवळ्या पिंड तयार होत गेला. साहित्याकडे, समाजाकडे तटस्थपणे पाहण्याची वैचारिक भूमिका त्यांना निष्पन्न होत गेली. यातूनच स्वतःची स्वतंत्र अशी राजकीय भूमिका तयार झाली. एक व्यक्ती, साहित्यिक व विचारवंत म्हणून त्यांच्या झालेल्या घडणीचा अभ्यास प्रस्तुत प्रकरणात आहे. हा अभ्यास त्यांच्या वाङ्मयीन कामगिरीचे स्वरूप शोधण्यासाठी पार्श्वभूमी म्हणून महत्त्वाचा आहे.

*अर्जुन डांगळे यांची कविता* या दुसऱ्या प्रकरणात त्यांच्या कवितेचे स्वरूप ध्यानात घेतले आहे. दलित पँथर चळवळीतील अनेक चढउतार या कवितासंग्रहाने चित्रीत केले आहेत. डांगळे यांच्या कवितेस राजकीय व सामाजिक जाणिवेचे पदर प्राप्त आहेत. सत्तरीनंतरचे सामाजिक वास्तव, दलितांचे दुःख, चळवळीतील अंतर्विरोध या कवितेतून अधोरखित झाले आहेत. डांगळे

यांची कविता ही मुख्यत्त्वे सामाजिक जाणिवेची कविता आहे. दलितांच्या वाट्याला येणारे असंख्य प्रश्न ती मांडते. दुःख, जातीव्यवस्था, नवी स्वप्ने व परंपरेविरोधी संघर्ष, आत्मभान, नकार व विद्रोहाची जाणीव तीमधून व्यक्त झाली आहे. महानगरीय जगण्यातील एकटेपण, निराशापण, वैफल्यग्रस्त जीवनाचे, तिथल्या दुःखाचे चित्रण आणि एकूणच महानगरीय माणसांच्या वृत्ती ते महानगरीय जाणिवेतून विशद करतात. आत्मनिवेदनपर कवितातून गेल्या तीनेक दशकातील दलित तरुणांचे भावविश्व ते आपल्या समोर मांडतात. मार्क्सवादी दृष्टिकोणातून समाजचिकित्सा आहे. वर्गभेद, आर्थिक शोषण, दारिद्र्य यांची सूत्रे मार्क्सवादी जाणीवेच्या कवितेतून आविष्कृत करतात. आंबेडकरी चळवळीने स्वातंत्र्य, समता, बंधूता व न्याय या मूल्यांवर आधारीत नवसमाजरचनेचे स्वप्न पाहिले होते. ते साकारण्याचे कार्य दलित कवितेने केलेले दिसून येते. आंबेडकरी विचारांचा केंद्रबिंदू हा सामान्य माणूस आहे. जो शोषित, पीडित, दलित आहे. ज्यांचे सामाजिक, आर्थिक, धार्मिक, सांस्कृतिक शोषण केले गेले आहे. असा हा माणूस आहे. डांगळे यांच्या कवितेतून या विचाराचे प्रकटीकरण होताना दिसते.

राजकीय जाणीव हा देखील अर्जुन डांगळे यांच्या कवितेचा महत्त्वाचा विशेष आहे. सत्तरीच्या दशकात ज्या राजकीय घडामोडी होत होत्या त्याचा आलेख डांगळे यांच्या लेखणीने आविष्कृत केला आहे. समकालीन राजकीय जीवनजाणिवांचे प्रकटीकरण या कवितांमधून व्यक्त झाले आहे. या सर्वांबरोबर विद्रोह हा देखील अटळ आहे. डांगळे यांच्या कवितेचा मुख्य स्वर हा विद्रोहाचा आहे. हा विद्रोह एका चिडीतून, एका संतापातून, दुःख भोगातून जन्माला आला आहे. विद्रोहाची आणि नकाराची अनेकविध रूपे कवितेतून दिसतात. या सर्वांबरोबरच प्रस्तुत प्रकरणात त्यांच्या कवितेचा अभिव्यक्तीदृष्ट्याही अभ्यास केला आहे. त्यांच्या कवितेतील दैनंदिन भाषेचा वापर, त्यातून आविष्कृत होणारी प्रतिमाशैली, बोलीभाषेचा वापर, काव्यात्मता हे विशेष सोदाहरण विशद केले आहेत.

अर्जुन डांगळे यांनी कवितेबरोबरच कथालेखनही केले आहे. *ही बांधाावरची माणसं* या कथासंग्रहात त्यांच्या अकराऐक कथा आहेत. या कथांमधील आशयरूपातील वेगळेपणाचा अभ्यास *अर्जुन डांगळे यांची कथा* या लघुप्रबंधाच्या तिसऱ्या प्रकरणात केला आहे. यामध्ये त्यांच्या कथेचे विश्लेषण आशय व अभिव्यक्तीचे स्वरूप विशेष शोधले आहे. प्रस्तुत प्रकरणात कथेतून मांडलेल्या आशयसूत्रांचे वर्गीकरण दलितांचे नागर व ग्रामीण जीवनानुभव, पोटजातीतील संघर्ष, आंबेडकरी विचारविश्व, राजकीय सत्तासंघर्ष व त्यातील परस्परविरोध, स्त्रीविश्व व व्यक्तिमनातील भावनांचे चित्रण या अनुषंगाने केले आहे. त्यांच्या कथेतून साामाजिक स्वरूपाचा आशय, अर्थानुभवाची वास्तवता आणि त्यातून उलगडत जाणारे विश्व याचे विश्लेषण केले आहे. डांगळे यांची कथा ही समतेची संकल्पना मांडते. सम्यक परिवर्तनाची तिला आस आहे. नवजागृत वंचित समाजाची कैफियत व त्यांना आलेले आत्मभान या कथा प्रत्ययकारीरित्या मांडतात. डांगळे

यांच्या कथेची वृत्ती ही वर्तमानाला सामोरे जाण्याची आहे. वर्तमानाला थेट प्रतिक्रिया देणारा या कथेतील निवेदक हा मौखिक परंपेरतील कथन परंपरेशी नाते जोडणारा आहे. अन्याय अत्याचार सहन न करता त्याविरोधात आवाज उठविण्याचा प्रयत्न तसेच समाजस्थितीचे विदारक रूप या कथांमधून दिसून येते. या कथांतील अनुभवविश्व हे मुख्यतः दलित जीवनाचे आकलन करणारे आहे. ग्रामीण व नागर संस्कृतीतील उपेक्षित, पीडित आणि अन्याय, अत्याचाराला तोंड देणाऱ्या लोकांचे हे चित्रण आहे. त्यांच्या कथेतून येणाऱ्या पात्रचित्रणांचा अभ्यासही अभिव्यक्ती विशेषांतर्गत केला आहे. कथेच्या आविष्कारासाठी वापरलेली निवेदनतंत्रे, भाषेचे स्वरूप, गद्यशैली, शब्दसंग्रह या विशेषांचाही विचार केला आहे. एकूणच कथेला साकार करणाऱ्या सर्व घटकांसोबत कथेचे निराळेपण सिद्ध करण्याचा प्रयत्न केला आहे. एकूण डांगळे यांच्या कथेचा ठसा तत्कालीन काळावरती कसा उमटतो याचे एक साररूप या प्रकरणातून मांडले गेले आहे. तसेच समकालीन कथेपेक्षा डांगळे यांच्या कथेच्या वेगळेपणाचा विचार या प्रकरणात केला आहे. गेल्या चारेक दशकातील या महत्त्वाच्या कथा आहेत. दलित वास्तव व त्यांचा वैचारिक प्रवास तीमधून अधोरेखित झाला आहे. विचार कथेचा आकृतिबंध हे त्यांच्या कथेचे वेगळेपण या प्रकरणात मांडले आहे.

कविता आणि कथा या लेखनाबरोबरच अर्जुन डांगळे यांनी वैचारिक लेखनही केले आहे. डांगळे यांच्या वैचारिक लेखनाचे स्वरूप *अर्जुन डांगळे यांचे वैचारिक वाङ्मय* या चौथ्या प्रकरणात मांडले आहे. डांगळे यांचे एकूण चार लेखसंग्रह व चार संपादित पुस्तके आहेत. *आंबेडकरी चळवळीचे अंतरंग* मधील त्यांच्या लिखाणातून आंबेडकरी विचाराविषयीचे एक वैचारिक सूत्र पहायला मिळते. प्रस्तावनेत रावसाहेब कसबे म्हणतात त्याप्रमाणे या लेखसंग्रहातून दलितांच्या सर्व प्रश्नांची सूत्रबद्ध मांडणी झालेली नसली तरी त्यांतून दलित चळवळीचे अंतरंग स्पष्ट करणारे एक वैचारिक सूत्र नक्कीच आपल्या ध्यानात येते. *निळे अधोरेखित* मधील त्यांच्या लेखनातून तत्कालीन आंबेडकरी चळवळीचा आशय व्यक्त होतो. आंबेडकरी चळवळीचे वास्तव चित्रण ते यामधून रेखाटतात. साठनंतरच्या मराठी दलित साहित्याच्या वेगळेपणाचे, त्याच्या प्रखर जाणिवेचे, सामाजिक चळवळीचे व दलित जीवनाचे दिशांकन या लेखसंग्रहातून ध्यानात येते. १९७० नंतरच्या दशकातील आंबेडकरी चळवळीने जी वळणे घेतली होती. त्या काळात ज्या राजकीय, सामाजिक वा आर्थिक घटना घडत होत्या. त्यांचा वृत्तांत डांगळे आपल्या दलित विद्रोह मधून मांडताना दिसून येतात. तर मृत्यूपर लेखनातून सामाजिक चळवळीत आघाडीवर कार्यरत असणाऱ्या नेत्यांच्या, कार्यकर्त्यांच्या कार्याचे स्मरण *मैदानातील माणसे* मधून घडते.

अर्जुन डांगळे यांच्या संपादन कार्याविषयीचा आढावा घेत असताना एक समीक्षक, विचारवंत म्हणून जी तटस्थ भूमिका हवी असते ती त्यांच्या लेखनातून प्रकर्षाने जाणवते. *दलित साहित्य : एक अभ्यास* या संपादित ग्रंथामधून नव्या जीवनवादी वाङ्मयाचा पुरस्कार करणाऱ्या

साहित्यप्रवाहासंबंधीचा लेखाजोखा आहे. *लोकशाहीर अण्णा भाऊ साठे : निवडक वाङ्मय* या ग्रंथातून अण्णा भाऊंच्या साहित्यातील निवडक वाङ्मय एकत्र केले आहे. *डॉ.बाबासाहेब आंबेडकर गौरवग्रंथातून* डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या एकूण जीवनकार्याविषयीचे विवेचन केले आहे. आंबेडकरी चळवळीतील महत्त्वाचे नेते दादासाहेब गायकवाड यांच्या जीवनकार्याचा आढावा *कर्मवीर दादासाहेब गायकवाड : काल आणि कर्तृत्व* मधून घेतला आहे. या महान नेत्यांनी आपल्या समाजबांधवासाठी जे कार्य केले त्यांच्या जीवनकार्याविषयीची ओळख समाजाला व्हावी यादृष्टीने अर्जुन डांगळे यांनी केलेला हा प्रयत्न महत्त्वाचा वाटतो.

थोडक्यात अर्जुन डांगळे यांचे लेखन हे प्रतिक्रियावाद व अभिप्रायात्मक स्वरूपाचे आहे. परिवर्तनवादी साहित्यप्रवाहाला बळकटी देणारे हे लेखन आहे. मानवी जीवन व वाङ्मयविषयक प्रश्नांची मूलभूत मांडणी हा डांगळे यांचा वैचारिक स्वभाव आहे. आंबेडकर तत्त्वज्ञानाचे भाष्यकार आणि समाज-संस्कृतीचे मनस्वी अभ्यासक म्हणून त्यांना ओळखले जाते. दलित चळवळीचा विचार ते गांभीर्याने करतात. अर्जुन डांगळे ह्यांचा ध्यास आणि ध्येयवाद आंबेडकर विचारसृष्टीचा वाहक असल्याने त्यांची लेखनशैली स्वतंत्र आणि समतोल असल्याची प्रचिती येते. दलित विचारविश्व हा त्यांच्या साऱ्या लेखनाचा समान केंद्रबिंदू आहे. आंबेडकर दलित समूह, त्यांचे लढे, त्याचे वैचारिक आधार, कृतिकार्यक्रम व दलित वाङ्मय याविषयीच्या चिंतनाचा पट त्यांच्या याप्रकारच्या लेखनातून व्यक्त झाला आहे.

एकूणच दलित चळवळीबद्दल एक वैचारिक पार्श्वभूमी तयार करण्याचे महत्त्वाचे कार्य अर्जुन डांगळे यांच्या लेखणीने तयार केले आहे. त्यांचे लेखन हे मुख्यत्वे ललित व वैचारिक स्वरूपाचे आहे. दलित समूहजाणिवेचा महत्त्वाचा आविष्कार त्यांच्या लेखनातून झाला आहे. कविता व कथांमधून त्यांनी आपला वैशिष्ट्यपूर्ण असा ठसा उमटवला आहे. स्वातंत्र्योत्तर काळातील महत्त्वाची दलित संवेदनशीलता अभिव्यक्त करणारे हे वाङ्मय आहे. आंबेडकरांच्या विचारांतून त्याची स्वतःची अशी एक तात्त्विक बैठक सिद्ध झाली आहे. त्यांचे हे वैचारिक समीक्षात्मक स्वरूपाचे लेखन जरी विकीर्ण स्फुट स्वरुपाचे वाटत असले तरी त्याच्यात एक अंतर्गत संगती आहे. प्रस्तुत लघुप्रंबधात अर्जुन डांगळे यांच्या साहित्याचे स्वरूप व वेगळेपणाचा विचार सर्वांगाने मांडण्याचा प्रयत्न केला आहे.



BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.